ई टेंडर नोटीस क्र.जिपउआ/तां/वाहतुक निविदा/ २०२५ नाशिक दिनांक २०/ ०६ /२०२५

जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नाशिक यांचे कार्यालय अंतर्गत

जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नाशिक (गोजातीय प्रजनन अधिनियम)

जिल्हा-नाशिक

या कार्यालयाच्या

दि. ०१/०७/२०२५ ते ३०/६/२०२६ या कालावधीसाठी

द्रवनत्र, द्रवनत्रपात्रे, इ. साहित्य वाहतूकीची ई-निविदा

जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, नाशिक यांचे कार्यालय अंतर्गत

जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नाशिक (गोजातीय प्रजनन अधिनियम)

जिल्हा नाशिक

ई निविदा सुचना

जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नाशिक (गोजातीय प्रजनन अधिनियम) पासून नाशिक जिल्हयातील पशुवैद्यकीय दवाखान्याना रेतमात्र व द्रवनत्राची (५० ते ५५ लिटर क्षमतेची अंदाजे ६० किलो वजनाची ४४ द्रवनत्र पात्रे) वाहतूक करणेसाठी वाहतूकदाराकडे पाच वर्षाच्या आतील नोंदणी असलेले टेम्पो वाहन असणे आवश्यक आहे. जिल्हयातील २६६ संस्थांना द्रवनत्र व रेतमात्रा पुरविण्यासाठी १४ रुटद्वारे सर्वसाधारणपणे ४००० कि.मी. याप्रमाणे वर्षात अंदाजे ४८००० कि.मी. वाहतूक करावी लागते. या व्यतिरिक्त द्रवनत्र खरेदीच्या होणा-या भावबंध करारानुसार द्रवनत्र आणणेसाठी नाशिकअथवा महाराष्ट्राच्या बाहेरील ठिकाणी दरमहा साधारणतः दोन ते तीन वेळा जावे लागेल. यासाठी सर्व अटी व शर्तीच्या अधीन राहून वाहनाचे कंत्राटदाराकडून ई-निविदा मागवित आहेत. सदर वाहतूक अनुक्रमे जिल्हाअंतर्गत व जिल्हयाबाहेर करावी लागेल.

१) ई-निविदेमध्ये वाहतूकीचा दर एका किलो मिटर करीता देणेचा आहे.

२) ई-निविदा कालावधी — दि.१/७/२०२५ ते ३०/६/२०२६ किंवा पुढील निविदा सन २०२६-२७ ची मंजुर होईपर्यंत राहील.

३) ई-निविदेच्या अटी व शर्ती तसेच निविदेसंबंधी इतर कोणतीही माहिती https://www.mahatenders.gov.inया वेबसाईटवर डाऊनलोड करता येईल ई-निविदा फॉर्म वेबसाईटवर भरणेचा कालावधी दि.२३/०६/२०२५ रोजी ११.१० वाजले पासुन दि. ३०/०६/२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत राहील.

४) ई-निविदा फॉमचे शुल्क रु.५४००/- (अक्षरी रुपये हजार पाचशे मात्र) व निविदा भरताना बयाणा रक्कम रुपये ९०,०००/- (अक्षरी रुपये नव्वद हजार मात्र) हे ऑनलाईन पध्दतीने बिड प्रक्रियेमध्ये (ऑनलाईन पेमेंट गेटवे) निविदाधारकांनी जमा करावयाचे आहेत.

५) ई-निविदाधारकाची निविदा मंजुर झाल्यास, परंतु अन्य कारणांनी त्यांची निविदा नाकारल्यास त्याची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६) ई-निविदा वेबसाईटवर भरणेची अंतिम तारिख,वेळ- दि. ३०/०६/२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यत

७) ई-निविदा उघडणेची अंतिम तारिख, वेळ- दि . ०१/०७/२०२५ रोजी सकाळी १५.०० वाजता राहील.

निविदाधारकांना ई-टेंडर कार्यवाहीमध्ये अडीअडचणी आल्यास जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त, नाशिक या कार्यालयाच्या ddcahnashik@gmail.comई मेल आयडी वर किंवा कार्यालयाच्या ०२५३-२९५९६०६ या क्रमांकावर दूरध्वनी करावा. कोणतेही कारण न देता ई-निविदा स्विकारणेचा अगर नाकारण्याचा अधिकार खाली सही करणार यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

(डॉ. प्रशांत अर्चना रमेश धर्माधिकारी)
जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
जिल्हा-नाशिक

नाशिक जिल्हा द्रवनत्र व रेतमात्रा वाहतूक निविदा २०२५-२६

द्रवनत्र वाहतुकीबाबत अटी व शर्ती

१. संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन (ई टेंडरींग) पध्दतीने राहील.

२. ई-निविदा कालावधी – दि.०१/०७/२०२५ ते ३०/६/२०२६ **किंवा पुढील निविदा सन २०२६-२७ ची मंजुर होईपर्यंत** राहील.

३. ई-निविदेच्या अटी व शर्ती तसेच निविदेसंबंधी इतर कोणतीही माहिती https://www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर डाऊनलोड करता येईल.

४. ई-निविदा फॉर्म वेबसाईटवर भरणेचा कालावधी दि. २३/०६/२०२५ रोजी ११.१० वाजलेपासुन दि. ३०/०६ /२०२५ रोजी १५.०० पर्यंत

५. ई-निविदा फॉर्मचे शुल्क रु.५४००/- (अक्षरी रुपये पाच हजार चारशेमात्र) व निविदा भरताना बयाणा रक्कम रुपये ९०,०००/- (अक्षरी रुपये नव्वद हजार मात्र) हे ऑनलाईन पध्दतीने बिड प्रक्रियेमध्ये (ऑनलाईन पेमेंट गेटवे) निविदाधारकांनी जमा करावयाचे आहेत

६. ई-निविदाधारकाची निविदा मंजुर झाल्यास, परंतु अन्य कारणांनी त्यांनी निविदा नाकारल्यास त्याची बयाना रक्कम जप्त करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

७. निविदा धारकाची **स्वतःची डिजीटल सिग्नेचर** की असणे बंधकारक राहील.

८. निविदा धारकांनी निविदा ऑनलाईन **दोन बिड पध्दतीने** सादर करावयाची आहे. तांत्रिक लिफाफ्यामधील सर्व कागदपत्रे ऑनलाईन भरुन निविदाधारकांनी डिजीटल सिग्नेचर करवयाची आहे. बीड प्रक्रिया करतांना तांत्रिक व व्यापारी लिफाफ्यासांठी Hash Value Generateकरावा लागेल याची नोंद घ्यावी की ऑनलाईन ओपन होतांना सर्व प्रथम तांत्रिक लिफाफामधील प्रपत्रे पहिल्यांदा उघडण्यात येईल. तांत्रिक लिफाफयामध्ये सर्व कागदपत्रे पुर्णपणे सादर केल्यावरच व्यापारी लिफाफा ऑन लाईन उघडल्या जातील.

९. निविदाधारकांनी माहिती भरतांना दुर्लक्ष केल्यास किंवा पुर्ण माहिती न भरल्यास सदरची निविदा ऑनलाईन रद्द होईल याची गाभीर्याने नोंद घ्यावी.

१०. ई निविदा वेळपत्रक (**Key Dates**)

Sr No.	Details	StartDate	StartTime Hrs.	EndDate	EndTime Hrs.
1	Publication of Tender	23.06.2025	11.00	-	-
2	Tender Download	23.06.2025	11.10	30.06.2025	15.00
3	Bid Submission	25.06.2025	11.10	30.06.2025	15.00
4	Pre-bid meeting	23.06.2025	11.00	-	-
5	Bid Opening	01.07.2025	15.00	-	-
6	Technical Bid Scrutiny	02.07.2025	11.00	02.07.2025	16.00
7	Commercial Bid Opening	02.07.2024	11.30	-	-

११. निविदा दोन प्रकारे सादर करणे आवश्यक आहे.

नं.१-तांत्रिक लिफाफयातील सहप्रपत्रे-

१. निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे स्वाक्षरी करुन सदर प्रपत्र भरावेत.

२. ई-निविदा फॉर्मचे शुल्क रु.५४००/- (अक्षरी रुपये पाच हजार चारशेमात्र) व निविदा भरताना बयाणा रक्कम रुपये ९०,०००/- (अक्षरी रुपये नव्वद हजार मात्र) हे ऑनलाईन पध्दतीने बिड प्रक्रियेमध्ये (ऑनलाइन पेमेंट गेटवे) निविदाधारकांनी जमा करावयाचे आहेत

३. वाहनासंबंधिची कागदपत्रे- वाहनाचे रजिस्ट्रेशन बुक व टॅक्स बुक, माल वाहतुकीचा परवाना,वाहनाचा विमा, पासिंग वर्ष व मुदतीबाबतचा तपशील. रहिवासी दाखला, समंतीपत्र, वाहनचालकाचे ड्रायव्हिंग लायसन्स वरिल सर्व कागदपत्रे तांत्रिक लिफाफयामध्ये अपलोड केले जातील.

नं.२- व्यापारी प्रपत्र-

१. दरपत्रक- वाहनाचा प्रति कि.मी. दर अक्षरी व अंकी नमूद करावा. सदर दरपत्रक ऑनलाईन दरपत्रकामध्येच नमुद करण्यात यावा. जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवाय नाशिक यांचे कार्यालय जिल्हा नाशिक यांच्याकडे दरपत्रक मंजुर अथवा नामजुंर करण्याचा अधिकार राहील.

१२) निविदा धारकांनी निविदा रजिस्टर पोस्ट/स्पिड पोस्ट/कुरीयर द्वारे पाठविल्यास निविदा स्विकारल्या जाणार नाहीत अथवा त्या ग्राहय धरल्या जाणार नाहीत.

१३) जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नाशिक (गोजातीय प्रजनन अधिनियम) पासुन नाशिक जिल्हयातील पशुवैद्यकीय दवाखान्यांना रेतमात्र व द्रवनत्राची (५० ते ५५ लिटर क्षमतेची अंदाजे ६० किलो वजनाची ४४ द्रवनत्रपात्रे) वाहतूक करणेसाठी योग्य वाहतूक क्षमता असलेले दहा वर्षांच्या आतील नोंदणी असलेले टेम्पो वाहन असणे आवश्यक आहे. जिल्हयातील २६६ संस्थांना द्रवनत्र व रेतमात्रा पुरविण्यासाठी १४ रुटद्वारे दरमहा सर्वसाधारणपणे ४००० कि.मी. याप्रमाणे वर्षात अंदाजे ४८००० कि.मी. वाहतूक करावी लागते. (सोबत केंद्रनिहाय १४ रुटचा तक्ता दिला आहे.) या व्यतिरिक्त द्रवनत्र खरेदीच्या होणा-या भावबंध करारानुसार द्रवनत्र आणणेसाठी नाशिक अथवा महाराष्ट्रा बाहेरील ठिकाणी दरमहा साधारणत : दोन ते तीन वेळा जावेलागेल. मुक्कामासाठी वेगळा आकार दिला जाणार नाही. वाहनचालका शिवाय वाहनासोबत एक मदतनीस ठेवणे व त्याने साधारणतः ६० किलो वजनाच्या द्रवनत्रपात्रांची वाहनातून चढउतार करणे व वाहनापासून केंद्राच्या ठिकाणी पात्रांची ने-आण करणेचे काम करणे आवश्यक आहे. मदतनीसाठी वेगळा आकार दिला जाणार नाही. तसेच इंधनाची दरवाढ झाली तरी दरात वाढ मिळणार नाही.

१४) वाहातुकीचे वाहनामध्ये कॉयरमॅटीग अथवा नरम आच्छादनाचा वापर करणे आवश्यक आहे.

१५) द्रवनत्र पात्राचे नुकसान व तुटफूट होणार नाही तसेच वाहन हुड असलेले असावे ज्यामूळे उन, वारा, पाऊस यापासून द्रवनत्रपात्रांना संरक्षण मिळेल.

१६) द्रवनत्र वायू हा अतिथंड अवस्थेत (-१९६ डिग्री सेल्शीअस) असतो. त्यामूळे वातावरणाशी संबंध येताना त्यातून जी वाफ निघते ती अति थंड असते याची माहिती ठेकेदाराने पुर्णपणे करुन घ्यावी. द्रवनत्र वायू एका पात्रातून दुस-या पात्रात टाकताना सावधपणे टाकावा तो निष्काळजीने वाया गेल्याचे आढळून आल्यास त्याची भरपाई ठेकेदाराने करुन द्यावी लागेल.

१७) वाहतुक कंत्राटदाराने ज्या गाडीने वाहतुक करणार आहे ते वाहन त्याच्या मालकीचे असावे. निविदाधारक हा शक्यतो नाशिक मुख्यालयाचा असावा.

१८) वाहन उपलब्ध करुन देण्याबाबत ठेकेदारास सर्वसाधारणतः २४ तासापूर्वी सुचना देण्यात येईल.

१९) प्रत्येक वहातुकीच्या वेळी द्रवनत्रपात्रे वाहन चालकाच्या ताब्यात देण्यात येतील म्हणून त्याची जबाबदारी वाहनाचे मालकावर निश्चित राहील. वहातुकीचे वेळी मालकाने किंवा त्याचे व्यक्तीनेही पात्रे हाताळताना निष्काळजीपणा झाल्यास व द्रवनत्रपात्राची तुटफूट होऊन नुकसान झाल्यास त्याची किंमत ठेकेदाराकडून वसूल करण्यात येईल.

२०) द्रवनत्राची वाहतुक करताना त्या गाडीमध्ये एक सहाय्यक पशुधन विकास अधिकारी व एक परिचर याप्रमाणे दोन प्रतिनिधी गाडीसोबत राहतील, अशा प्रकारचा परवाना असणे आवश्यक आहे.

२१) द्रवनत्र वहातुकीचे वेळी वाहतुक मार्गात उपकेंद्राचे ठिकाणी वा द्रवनत्र भरुन घेण्याचे ठिकाणीघाईन करणारे व सभ्य वागणूकीचेच वाहन चालक व इतर मदतनीस असतील याची खबरदारी वाहन ठेकेदाराना घ्यावी लागेल.

२२) यशस्वी निविदा धारकास निवीदा मंजूर झाल्यापासून सात दिवसाचें आत वाहतुकीच्या कार्यकृतिची हमी पूर्ण करणेबाबत करारनामा नियमानुसार १०० रुपयाच्या स्टँप पेपरवर लिहून द्यावा लागेल त्या शिवाय वहातुक ठेका मंजूर केला जाणार नाही.

२३) ठेकेदाराने ठेका स्विकारुन काम सुरु झाल्यावर नियमाप्रमाणे काम पार पाडण्याचे नाकारले तर त्याची भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. तसेच नविन ठेका मंजूर करताना जास्त दर मंजूर करावा लागला तर पूर्ण ठेक्याच्या रक्कमेतील फरक मूळ ठेकेदाराच्या सुरक्षा ठेवीतून व स्थावर जंगम मालमत्तेतून वसूल करण्यात येईल.

२४) जे निवीदाधारक दुस-या क्रमांकावर राहतील त्याची अनामत रक्कम एक महिनेचे आत परत करण्यात येईल व इतराची अनामत रक्कम ताबडतोब परत करण्यात येईल.

२५) भारत सरकार आयकर विभाग यांच्या नियमाप्रमाणे भावबंध कराराप्रमाणे प्राप्त होणा-या रकमेवर नियमाप्रमाणे लागू असलेला अधिभारासह आयकर ठेकेदारास देय असलेल्या रकमेतून परस्पर कापून या कार्यालयातर्फे सरकारजमा करण्यात येईल याशिवाय शासनाने वेळोवेळी निर्गमित होणा-या सूचनेप्रमाणे आपणांस लागू असलेल्या कराच्या रकमेची कपात देयकातून वसूल केली जाईल.

२६) नियमानुसार देय पथकर (टोल) ठेकेदारास द्यावा लागेल.

२७) वाहतूकीचे वेळी वाहनाचे कि.मी. रिडींग सुरु असणे आवश्यक आहे.वाहतुकीची देयके ३० दिवसातून एकदाच स्विकारली जातील. वाहतुक ठेकेदाराने वाहतुकीची देयके वेळीच सादरकरावीत. सदर देयके जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवाय, नाशिक जिल्हा नाशिक कार्यालयातर्फे अदा केली जातील. तथापि काही प्रशासकिय कारणामूळे विलंब झाल्यास वाहतूक बंद करता येणार नाही.

२८) वाहतुक करीत असताना अचानक गाडीस बिघाड झाल्यास गाडीची दुरुस्ती ठेकेदारास स्वखर्चाने त्वरीत करावी लागेल. प्रवासात सदर वाहनवेळेत दुरुस्ती न झाल्यास व दुसरे वाहनाची आवश्यकता वाटल्यास दुसरे वाहन भाडयाने घ्यावे लागले तर त्याचे पुर्ण भाडे ठेकेदारास द्यावे लागेल.

२९) निविदेत ठरलेले वाहन ठरलेल्या वेळेवर कामाकरिता व ठरवलेल्या वाहतुकीसाठी वाहातुकदारास काही कारणामूळे उपलब्ध करुन देता आले नाही तर अपरिहार्य परिस्थितीत दुसरे वाहन या कार्यालयासाठी उपलब्ध करुन द्यावे लागेल. (पर्यायी व्यवस्था म्हणून) त्याकरीता जास्त आकार पडला तर तो स्वतः ठेकेदारास भरावा लागेल. ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे वाहन उपलब्ध न झाल्यास कार्यालय बाजारातील दुसरे वाहन उपलब्ध दराने मिळवेल व त्यासाठी द्यावे लागणारे जास्तीचे भाडे ठेकेदाराच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

३०) वाहतूक करीत असताना ठेकेदार अथवा प्रतिनिधीकडून कोणत्याही प्रकारचा वाहन परिवहन विषयक किंवा पोलीस कायदा विषयक नियमाचे उल्लंघन झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ठेकेदारावर राहील व वाहन जप्त वद इतर कार्यवाहीसाठी खोळंबून ठेवल्यास द्रवनत्र पात्रांच्या वहातुकीसाठी दुसरे पर्यायी वाहन उपलब्ध करुन देवून त्यामधून द्रवनत्रपात्राची वाहतुक जबाबदारीने करुन द्यावी लागेल.

३१) एकाच वेळी एकापेक्षा जास्त वाहने शासकीय कामासाठी आवश्यक असल्यास अन्य सुस्थितीतील परिवहन नियम योग्य वाहने उपलब्ध करुन द्यावी लागतील ही वाहने अशावेळी मुख्य ठेकेदाराव्यतिरिक्त दुस-याचे असू शकतील मात्र वाहतुकीची संपूर्ण जबाबदारी ठेकेदाराचीच राहील व वहातुकीचे दर भावबंधीत करारात निश्चित केल्याप्रमाणेच प्रति कि.मी.या दराने दयावे लागतील.

३२) संबंधित वाहनात इंधन, ऑईल, ग्रीस इत्यादि वाहतुक ठेकेदारास स्वखर्चाने करावा लागेल व काही कारणाने इंधनाचा भाव वाढल्यास संबंधीत कार्यालय भाववाढ देणार नाही.

३३) वाहतुक करीत असताना शासकिय कामास्तव केंद्रावर किंवा कार्यालयात मुक्कामाच्या कालावधीकरिता कोणताही वेगळा आकार देण्यात येणार नाही. शासकिय प्रतिनिधीला कामाचे स्वरुपानुसार त्या कार्यालयात/केंद्रावर थांबता येईल व तोपर्यत वाहन तेथे ठेवावे लागेल.

३४) या कार्यालयाकरीता नेमलेले वाहनच वाहतुकीसाठी उपलब्ध करुन द्यावे लागेल व काही कारणाने ठेकेदाराने अन्य वाहन उपलब्ध करुन दिले तरी भावबंद करारानुसार असलेलाच प्रति कि.मी. दर मिळेल.

३५) वाहतुक करीत असताना संबंधित वाहनात ठेकेदाराच्या अधिकृत दोन प्रतिनिधी शिवाय इतर कोणतेही प्रवासी/सामान घेवू नये तसे आढळल्यास कमीत कमी रु. १००/- व जास्तीत जास्त रु. १०००/- दंड आकारण्यात येईल.

३६) गाडीचा वेग दर ताशी ४० किं.मी पेक्षा जास्त ठेवता येणार नाही. तसेच मद्यपान इत्यादि करुन चालक आढळल्यास व गाडीच्या वेग मर्यादेचे उल्लंघन आढळल्यास त्यास रु. १००/- ते रु. १०००/- पर्यंत दंड आकारण्यात येईल व मद्यपानाबाबत कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. त्यामूळे शासकीय संपत्तीचे नुकसान झाल्यास ते ठेकेदाराने भरुन द्यावे लागेल.

३७) हेच वाहन पशुसंवर्धन खात्याच्या इतर संस्थांच्या योजनांतर्गत व वहातुकीकरिता लागल्यास उपलब्ध करुन द्यावे लागेल.

३८) वाहनामध्ये वाहतूकीच्यावेळी आवश्यक्ता असल्यास खात्याचे अतिरिक्त प्रतिनिधी वाहनासोबत जावू शकतील.

३९) जिल्ह्यांतर्गत द्रवनत्र वाहतूक करताना जिल्हयातील प्रत्येक केंद्रावर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नाशिक (गोजातीय प्रजनन अधिनियम) जिल्हा नाशिक यांचे आदेशानुसार ठरवून दिलेल्या मार्गानेच वाहतुक करण्याचे बंधन ठेकेदारावर राहील.

४०) या संबंधित उद्‌भवणा-या तक्रारीचे निराकरण करण्याचे अंतिम अधिकार जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त नाशिक जिल्हा नाशिक यांना राहतील.

४१) संबंधित वाहनासोबत वाहनाची कागदपत्रे ठेवणे बंधनकारक राहील.

४२) तसेच वाहनावर महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असा फलक फक्त या कार्यालयाचे कामकाज करतानांच लावायचा आहे.

४३) जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवाय नाशिक, जिल्हा नाशिकयांना ठेकेदाराचे काम समाधानकारक न आढळल्यास ते बंद करण्याचे व तत्सम दुसरी कार्यवाही करण्याचे अधिकार राहतील. अशा वेळी सुरक्षित ठेव अनामत रक्कम जप्त करुन ठेकेदारावर कार्यवाही करण्यात येईल.

४४) सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा कृत्रिम रेतन नाशिक (गोजातीय प्रजनन अधिनियम) जिल्हा नाशिक यांनी वेळोवेळी केलेल्यासुचना व अटींमध्ये वेळोवेळी केलेला बदल ठेकेदारास मान्य करावा लागेल.

४५) द्रवनत्र वाहतुकीच्या निविदा कालावधीत जर खात्याने वाहतुकीची पर्यायी व्यवस्था केली तर वाहतुक करार केंव्हाही रद्द केला जाईल.

४६) निविदेमध्ये कोणतीही अट किंवा पर्याय निविदा धारकास देता येणार नाही उपकंत्राटक देता येणार नाही.तसेच एकापेक्ष अधीक दर नमुद करता येणार नाही असे झाल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.

४७) निविदा प्रक्रियेत तीन पेक्षा कमी ग्राहय निविदाप्राप्त झाल्यास अथवा अल्प प्रतीसादामुळे निविदेस पुन्हामुदत वाढ देण्यात येईल (फेर निविदा सुचनेद्वारे)

४८) संपूर्ण ई निविदा स्विकारणे, मंजूर करणे, रद्द करणे व इतर कोणतेही कारण न दाखविता मान्य न करणे वगैरे सर्व बाबतीत अधिकार निवीदा समितीकडे राहतील व समितीचा निर्णय ठेकेदारास बंधनकारक राहील. सदर निविदांबाबत कोणताही वाद उद्‌भवल्यास अथवा न्यायालयीन प्रकरण (कोर्ट मॅटर) झाल्यास नाशिक येथील न्यायालयातच अपील करणे बंधनकारक राहील.

(डॉ. प्रशांत अर्चना रमेश धर्माधिकारी)
जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
जिल्हा-नाशिक

वरील सर्व १ ते ४८ अटी व शर्ती मी वाचल्या असून, त्या सर्व मला मान्य व बंधनकारक आहेत

वाहतुक कंत्राटदाराची सही
संपूर्ण नाव-
पुर्ण पत्ता-
संपर्क क्रमांक

द्रवनत्र वाहतूकसाठी केंद्रनिहाय १४ रुटचा (अंदाजे किलोमीटर दर्शविणारा) तक्ता

अ.क्र	मार्ग	कि. मी.
१	येवला मार्ग	३७०
२	निफाड मार्ग	२३५
३	सिन्नर मार्ग	३०५
४	मालेगांव मार्ग	४२५
५	निमगांव मार्ग	३८१
६	चांदवड मार्ग	४४७
७	कळवण मार्ग	३३६
८	नामपुर मार्ग	३७५
९	सटाणा मार्ग	३२५
१०	दिंडोरी	१९४
११	ईगतपुरी	१९५
१२	त्रिंबक मार्ग	१६१
१३	हरसुल, पेठ मार्ग	२४०
१४.	सुरगाणा	३१०

जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवाय नाशिक

ई-निविदा सूचना

जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, नाशिक यांच्या कार्यालयार्फत नाशिक जिल्हयातील पशुसंवर्धन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व जिल्हा परिषदस्तरीय आणि राज्यस्तरीय कृत्रिम रेतन केंद्रांना द्रवनत्र पुरवठा करण्यासाठी सन २०२५-२६ साठी **(दिनांक ३० जून २०२६) पर्यंत अथवा पुढील द्रवनत्र वाहतूक करार अमलात येईपर्यंत** द्रवनत्र वाहतूक कंत्राटदार नेमण्यासाठी दोन लिफाफा पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

(१) निविदा विक्रीचा कालावधी : दिनांक २३ जुन २०२५ सकाळी ११.०० वाजता

(२) निविदापूर्व बैठक : दिनांक २५ जुन २०२५ सकाळी ११.०० वाजता जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवाय नाशिक कार्यालय नाशिक येथे.

(३) निविदा तयार करण्याचा कालावधी : दिनांक २३ जुन २०२५ सकाळी (सकाळी ११.१० पासुन) ते दिनांक ३० जुन २०२५ (दुपारी १५.०० वा) पर्यंत

(४) निविदा बंद करण्याचा दिनांक : दिनांक ३० जुन २०२५ सकाळी १५.०० वाजता

(५) निविदा सादर करण्याचा दिनांक : २३ जुन २०२५ सकाळी (सकाळी ११.१० पासुन) ते दिनांक ३० जुन २०२५ (दुपारी १५.०० वा) पर्यंत

(६) तांत्रिक/व्यापारी लिफाफा उघडण्याचा दिनांक : दिनांक ०१ जुलै २०२५ सकाळी १५.०० वाजता

(१) उपरोक्त निविदा सूचनेतील अधिक माहितीकरिता इच्छुक निविदाकारांनी https://www.mahatenders.gov.inया संकेतस्थळावर संपर्क साधावा.

(२) सहभागी होणा-या निविदाकारांना निविदा शुल्क रुपये ५४००/- (प्रति निविदा फॉर्म) आणि रुपये ९०,०००/- बयाणा रक्कम भरावे लागतील.

(३) निविदेचे वेळापत्रक व अटी शर्ती संबंधी अधिक माहिती https://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(४) जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त,नाशिक यांनी कोणतेही कारण न देता निविदा नाकारण्याचा अधिकार स्वत: कडे राखून ठेवला आहे.

(डॉ. प्रशांत अर्चना रमेश धर्माधिकारी)
जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
जिल्हा-नाशिक

District Deputy Commissioner of Animal Husbandry Nashik

Liquid Nitrogen Transport e-Tender Schedule

Year 2025-26

Sr No.	Details	StartDate	StartTime Hrs.	EndDate	EndTime Hrs.
1	Publication of Tender	23.06.2025	11.00	-	-
2	Tender Download	23.06.2025	11.10	30.06.2025	15.00
3	Bid Submission	23.06.2025	11.10	30.06.2025	15.00
4	Pre-bid meeting	25.06.2025	11.00	-	
5	Bid Opening	01.07.2025	15.00	-	-
6	Technical Bid Scrutiny	02.07.2025	11.00	02.07.2025	16.00
7	Commercial Bid Opening	02.07.2025	11.30	-	-

(डॉ. प्रशांत अर्चना रमेश धर्माधिकारी)
जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय
जिल्हा-नाशिक

जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवाय नाशिक अंतर्गत
जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र, नाशिक (गोजातीय प्रजनन अधिनियम)
जिल्हा नाशिक

द्रवनत्र, द्रवनत्रपात्रे, इ. साहित्य वाहतूकीची ई निविदा सन २०२५-२६

निविदा प्रपत्र

ई निविदा भरण्याची अंतिम तारीख व वेळ - दि. ३०/०६/२०२५ रोजी १५.०० वाजेपर्यंत.

निविदा उघडण्याची तारीख व वेळ -   दि. ०२/०७/२०२५ रोजी ११.३० वाजता.

निविदा उघडण्याचे ठिकाण - जिल्हा पशुसवंर्धन उपायुक्त नाशिक, जिल्हा नाशिक यांचे कार्यालय

निविदेचा कालावधी - **दिनांक ०१/०७/२०२५ ते ३०/०६/२०२६ किंवा पुढील वर्षाची निवीदा अंतिम होईपर्यंत.**

दरपत्रक

(व्यापारी प्रपत्र)

अ.क्र	वाहनाचा तपशील	प्रति किलोमीटर दर अंकी रुपये	प्रति किलोमीटर दर अक्षरी रुपये
१	२	३	४
१	वाहनाचा क्रमांक-		
२	मेक-		
३	आर.टी.ओ.पासींग-		
४	खरेदी वर्ष-		

वाहतूकीच्या अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या सर्व मला मान्य आहेत.

दिनांकः-   सही/-
ठिकाण -

निवीदा धारकाचे संपूर्ण नाव-
पत्ता-(दुरध्वनी क्रमांकासह)

निविदा धारकाचे संमतीपत्र

विषय- महाराष्ट्रातुन व महाराष्ट्राबाहेरील राज्यातील कुठल्याही ठिकाणाहुन दि.०१-०७-२०२५ ते दि. ३०-०६-२०२६ या कालावधी करीता द्रवनत्र पात्रामधुन द्रवनत्र भरुन आणुन नाशिक जिल्हयातील २६६ कृत्रिम रेतन उपकेंद्राना पुरवठयाकरीता तसेच गरजेनुसार सांगतील त्या वाहुकीसाठी कामाची ई निविदा (द्रवनत्र पात्र व रेतमात्रा वाहतुकीच्या कामाची ई-निविदा).

संदर्भ-ई टेंडर नोटीस क्र. जीपउआ/तांत्रिक/वाहतुकनिविदा/ /२०२५, नाशिक दि. / /२०२५

१. निविदेतील संपुर्ण काम निविदेच्या अटी व शर्तीनुसार विहित मुदतीत पुर्ण करण्यास माझी तयारी आहे.

२. निविदेतील नमुद अटी व शर्ती मला मान्य असुन त्या माझ्यावर बंधकारक आहेत.

३. निविदेतील सर्व अटी व शर्ती मी वाचुन समजुन घेतल्या आहेत.

४. निविदेत नमुद केलेले दर सर्व करासहीत आहेत.

५. ई-निविदा फॉर्मचे शुल्क रु.५४००/- (अक्षरी रुपये पाच हजार चारशेमात्र) व निविदा भरताना बयाणा रक्कम रुपये ९०,०००/- (अक्षरी रुपये नव्वद हजार मात्र) हे ऑनलाईन पध्दतीने बिड प्रक्रियेमध्ये (ऑनलाईन पेमेंट गेटवे) भरण्यास मी तयार आहे.

६. माझी निविदा स्विकृत झाल्यास रक्कम रु. ६००००/- मात्र जमानत ठेव म्हणुन जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवाय नाशिक यांच्या नावाने रोखीत दर्शनी हुंडी (डिपॉझीट ॲट कॉल रिसीट) स्वरुपात तात्काळ भरण्यास मी तयार आहे.

७. निविदेतील नमुद काम अटी व शर्तीनुसार न चुकता करण्याची मी हमी देत आहे कामात काही अडचण विलंब, नुकसान झाल्यास जबाबदारी माझी राहील. त्याबाबत वसुली माझे बयाणा रक्कम/सुरक्षा अनामत रक्कम मधुन करण्यास माझी काहीही हरकत नाही.

निविदाधारकाची सही शिक्का
निविदाधारकाचा संपुर्ण पत्ता मोबाईल नंबरसह

परिशिष्ट-अ

निविदाकाराने सादर करावयाच्या बाबींची यादी.

अ.क्र.	तपशील	शेरा	पृष्ठ क्रमांक
१	निविदेच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे पीडीएफ फॉरमॅट मध्ये निविदाधारकाचे लेटरहेडवर विहित नमुन्यातील संमतीपत्र		
२	निवीदेच्या अंतीम तारखेपर्यत ग्राहय असलेले आयकर भरल्या संबधीचे सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र.		
३	वाहनाचा विमा भरला असल्याची कागदपत्रांच्या सांक्षाकिंत प्रती.		
४	वाहनकर पुस्तिका,पंजीकृत नोंदणी पुस्तिका (रजिस्ट्रेशन बुक)यांच्या सांक्षाकिंत प्रती,मालवाहतुक परवाना		
५	पी.यु.सी प्रमाणपत्र.नॉनकनविक्शन दाखला		
६	पॅनकार्ड प्रत व स्वतः च्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत अकाउंट नंबर,बँक , कोड वआयएफसी कोडसह.		
७	बयाणा रक्कम म्हणून रु. ९०,०००/- (अक्षरी रुपये नव्वद हजार मात्र) व निविदा फॉर्म डाऊनलोडींग फी रु.५४००/- (अक्षरी रुपये पाच हजार चारशे मात्र) ई बँकिंगव्दारे जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांचे खाते क्रमांकामध्ये भरल्याची स्कॅन केलेली पावती		

वरीलप्रमाणे सर्व कागदपत्रे मी तपासुन जोडलेली आहेत व ती बरोबर आहेत.

दिनांकः-

सही/-

ठिकाणः- **निवीदा धारकाचे संपूर्ण नाव-**